# प्रसिद्धीपत्रक

**मानधन तत्वावर "मोडी लिपीतील मजकुराचे मराठीमध्ये लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद" करणाऱ्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांची नामिका स्थापन करण्याबाबत.**

विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन या कार्यालयामार्फत ३० मोडी लिप्यंतरकारांची निवड करण्यात आली आणि मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दिनांक २७ मे, २०२६ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे ३० मोडी लिप्यंतरकारांची नामिका स्थापन करण्यात आली. राज्यभरातून मोडी लिप्यंतरकारांची वाढती मागणी आणि मोडी लिप्यंतरकारांकडून नामिकेत समाविष्ट करण्यासाठी प्राप्त झालेली निवेदने व विनंती अर्ज विचारात घेता, मोडी लिप्यंतरकारांची सदर नामिका विस्तारित करण्यात येत आहे. नामिकेमध्ये अधिक संख्येने मोडी लिप्यंतरकारांचा समावेश करण्याच्या दृष्टीने या प्रसिद्धीपत्रकापासून दिनांक २५.०८.२०२६ पर्यंत नव्याने अर्ज मागविण्यात येत आहे.

उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व अनुभव यासह अन्य अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेतः-

१) अनुवादकास प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी, इत्यादी अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्याचा अनुभव असावा.

२) मोडी तज्ज्ञ अनुवादकास मोडी लिपीचे आणि इंग्रजी व मराठी विषयांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) ज्या व्यक्तींनी उपरोक्त एक किंवा अनेक विषयांमध्ये स्वतः मोडीतून मराठीत लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीत अनुवाद करून पुस्तके प्रकाशित केली आहेत अशा व्यक्ती देखील अर्ज करू शकतात.

४) अनुवादकास पुरेसे संगणक ज्ञान आवश्यक आहे. अनुवादकांकडे इंटरनेटसह संगणकाची सुविधा असावी.

५) मोडी लिपीतील ज्ञानासाठी तसेच इंग्रजी व मराठी भाषेतील ज्ञानासाठी शासन मान्यता प्राप्त संस्थेतील किंवा महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी/पदवी/अनुवाद पदविका अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम प्रमाणपत्र असलेले उमेदवार देखील यासाठी अर्ज करू शकतात.

६) नामिकेवर घेतलेल्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांना, शासनाच्या विविध विभाग, मंडळे, महामंडळे यांच्याकडून अनुवादांची कामे परस्पर पाठविण्यात येतील तसेच संबंधित विभाग व कार्यालय आणि मोडी तज्ज्ञ अनुवादक यांच्यामध्ये ठरविण्यात येईल अशा मुदतीत ही कामे विहित मुदतीत पूर्ण करून देणे ही नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांची जबाबदारी असेल.

७) नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांनी अनुवादाचे काम समाधानकारक पूर्ण करून दिल्यावर, शासन वेळोवेळी निश्चित करील त्या दरानुसार काम देणाऱ्या विभागाकडून किंवा कार्यालयाकडून किंवा संस्थेकडून अशा अनुवादकांना मानधन प्रदान करण्यात येईल.

८) मोडी तज्ज्ञ अनुवादकाने अनुवादित केलेल्या अनुवादाच्या अचूकतेची व अर्थपूर्णतेची जाबाबदारी सर्वस्वी संबंधित अनुवादकाची राहील.

९) मोडी अनुवादकांनी, त्यांच्या कामाचा सहामाही अहवाल अनुक्रमे, दरवर्षी १५ जुलै व १५ जानेवारीपर्यंत विहित नमुन्यात या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक राहील.

१०) मोडी लिपीतील मजकुराच्या लिप्यंतराच्या व अनुवादाच्या कामातील अचूकता, कार्यक्षमता व कार्यतत्परता याचा आढावा घेऊन नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांना वगळण्याचा तसेच नवीन मोडी तज्ज्ञ अनुवादकांचा नामिकेत समावेश करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

तरी इच्छुक मोडी तज्ज्ञ अनुवादकांनी आपले अर्ज मूळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ या पत्त्यावर किंवा या कार्यालयाच्या **bhashasanchalak@yahoo.in** या ईमेलवर दिनांक २५.०८.२०२६ पर्यंत पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(अरुण वा.गिते)
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

**दिनांक :- २५ जून, २०२६**